## नि.दि.मु.क्र.०४/२०१४ मधील निशाणी क्र.१६७ वरील आदेश
## (CNRNo.MHSI09000042014)

०१. अर्ज व त्यावरील प्रतिवादींचा जबाब वाचला. उभय पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०२. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०७ पंढरीनाथ गणपत कोयंडे यांचे कायदेशीर वारस दाखल करण्यास झाला विलंब माफ करुन वारस दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभय पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेऊन संचिकेचे अवलोकन केले असता, वादीच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र.०७ पंढरीनाथ हे दि.११/१०/२०२० रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तूतचा दावा वाटप व पृथ्थक कब्जाकरीता दाखल केला आहे. परीणामी, दाव्याचे स्वरुप व कोरोना कालावधी लक्षात घेता, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करणे न्यायसंगत वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**– आदेश –**

०१. निशाणी क्र.१६७ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी खर्च म्हणुन रु.२००/-(रूपये दोनशे फक्त) प्रतिवादींना द्यावे.

०३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2023.04.24 17:13:14 +1000

स्थळ : देवगड (एस.बी.वाळके)

दिनांक : २४/०४/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.